महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्र.३७४(२)/स्थापत्य/२०१९/१९ दिनांक:-५ जानेवारी, २०२२

# -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय:- महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा-२०१९ च्या मुलाखत कार्यक्रमाबाबत.**
**संदर्भ:- जाहिरात क्रमांक ०५/२०१९ व अधिसूचना क्रमांक १७/२०१९.**

महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा - २०१९ च्या लेखी परीक्षेचा दिनांक २३ जुलै, २०२१ रोजी जाहीर करण्यात आलेल्या सुधारीत निकालाद्वारे अर्हताप्राप्त ठरलेल्या पुणे, मुंबई आणि औरंगाबाद केंद्रावरील पुढील टप्प्यातील उमेदवारांच्या मुलाखतीचा कार्यक्रम खालील प्रमाणे निश्चित करण्यात आला आहे :-

| मुलाखत केंद्र | मुलाखत दिनांक |
|---|---|
| पुणे | १० ते १३ जानेवारी, २०२२ |
| औरंगाबाद | १० ते १५ जानेवारी, २०२२ (०६ दिवस) |
| मुंबई | ११ ते १३ जानेवारी, २०२२ (०३ दिवस) |

२. सदर मुलाखतीकरीता उमेदवारांची संख्या व्यापक असल्याने ही मुलाखत प्रक्रिया टप्प्या-टप्प्याने राबविण्यात येत आहे.

३. मुलाखतीचा कार्यक्रम आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे प्रसिध्द करण्यात येत असून त्यामध्ये मुलाखतीचे ठिकाण, दिनांक व वेळ नमूद करण्यात येईल.

४. दिनांक १० व ११ जानेवारी, २०२२ या कालावधीतील नाशिक केंद्रावरील मुलाखत कार्यक्रम प्रशासकीय कारणास्तव मुंबई येथे दिनांक ११ ते १३ जानेवारी, २०२२ या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे.

५. मा. उच्च न्यायालयात दाखल रिट याचिका क्र. २२७०/२०२१ व २९३९/२०२१ प्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या अनुक्रमे दिनांक २० सप्टेंबर, २०२१ व दिनांक १ ऑक्टोबर, २०२१ रोजीच्या आदेशानुसार एकूण २८ उमेदवारांच्या मुलाखतीचा कार्यक्रम पुणे केंद्रावर उपरोक्त कालावधीत आयोजित करण्यात आला आहे.

६. मुलाखत दिनांक / ठिकाण बदलण्यासंदर्भात आयोगाकडे पत्रव्यवहार करण्यात आलेल्या उमेदवारांच्या मुलाखतीचा कार्यक्रम मुंबई केंद्रावर उपरोक्त कालावधीत आयोजित करण्यात आला आहे.

७. कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर आयोगाकडून मुलाखतपत्रावर दिलेल्या सूचनांचे तसेच स्थानिक प्राधिकरणाकडून करण्यात आलेल्या उपाययोजनांचे पालन करणे अनिवार्य राहील.

ठिकाण- मुंबई.

उपसचिव, परीक्षोत्तर (रा. प.)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.